Reg. No. NP CITY/236/2018-20.

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

वर्ष ११, अंक ३५] बुधवार, नोव्हेंबर २६, २०२५/अग्रहायण ५, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ५५.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

भाग एक–नागपूर विभागीय पुरवणी

संकीर्ण अधिसूचना : नेमणुका, इ. इ. केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले नियम व आदेश

भाग १ (असा.) (ना. वि. पु.) म. शा. रा.,अ. क्र. ९७.

उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, यांजकडून

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अन्वये कलम ११ (१) खालील प्रारंभिक अधिसूचना

क्रमांक अ.का.-उविअ-भूसंपादन-गो.प्र.-कावि-१०५२-२०२५. —

ज्याअर्थी, भूमि संपादन,पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क़ अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) च्या कलम-३ च्या (खंड) (ई) च्या परंतुकाव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसुल व वनविभाग क्रमांक संकीर्ण ११-२०१४-प्र. क्र. ७७-अ-२ दिनांक १९ जानेवारी, २०१५ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम-३ च्या खंड (झेड-ए) मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा जास्त नसेल इतक्या क्षेत्रातील जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समूचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या, चंद्रपूर जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यास यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त जमीन " असा करण्यात आला आहे)सार्वजनिक प्रयोजनाकरीता (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन " असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे, अथवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे असे वाटते, ज्याच्या स्वरुपाचे विवरण यासोबत जोडलेल्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे;

आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (१) च्या तरतुदीन्वये असे अधिसूचित करण्यात येते की उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची-तीनमध्ये दिलेली आहेत. (विस्थापन होणार असेल तर या अनुसूचीमध्ये कारणे नमूद करावी) ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची-चारमध्ये दिलेला आहे;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम (१) अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील, यासोबत जोडलेल्या अनुसूची-पाचमध्ये दिलेला आहे. (नियुक्ती करणे आवश्यक असेल तर या अनुसूचीमध्ये तपशील नमूद करावा) ;

त्याअर्थी, आता असे घोषीत करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (४) अनुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण चार खालील कार्यवाही पुर्ण होईल त्या कालावधीपर्यंत जमिनीचा अथवा तिच्या भागाचा कोणताही व्यवहार करणार नाही किंवा उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यास जिल्हाधिकाऱ्यास विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करुन अशा मालकास उपरोक्त तरतुदीच्या प्रवर्तनातून सूट देता येईल.

परंतु, आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे बुध्दीपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याकडून भरपाई दिली जाणार नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम (५) अनुसार जिल्हाधिकारी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यापुढे ज्यांच्या निर्देश "उक्त नियम " असा करण्यात आला आहे) यांच्या नियम १० च्या उप-नियम (३) व्दारे विहीत केल्याप्रमाणे भूमि अभिलेखाच्या अद्यावतीकरण्याचे काम हाती घेणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे.

आणि म्हणून, त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (छ) अन्वये समूचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी,ब्रम्हपुरी, जि. चंद्रपूर यास पदनिर्देशित करित आहे.

अनुसूची–एक

जमिनीचे वर्णन

भूसंपादन प्रकरण क्रमांक- ०३-एलए-६५-२०२५-२०२६, मौजा नवेगाव पांडव, तालुका नागभीड, जिल्हा चंद्रपूर., प. हं. नं. १०.

अ. क्र.	सर्व्हे क्रमांक/ गट क्रमांक	संपादनाखालील क्षेत्र (अदमासे)
(१)	(२)	(३)
		हे. आर
१	९/१	० १५
	एकूण . .	० १५

अनुसूची-दोन

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नाव	:-	गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्प.
प्रकल्पाकार्याचे वर्णन	:-	गोसेखुर्द प्रकल्प अड्याळ उपसा सिंचन योजनेचे बांधकामाकरीता.
समाजाला मिळणारे लाभ (आर्थिक, रोजगार, पायाभुत सुविधा, सोयी सुवधा याबाबत व इतर लाभासंबंधात)	:-	गोसीखुर्द प्रकल्पामुळे १,९०,००० हे. आर क्षेत्रात सिंचनाचे लाभ प्राप्त होणार आहेत.

अनुसूची-तीन

बाधीत व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे

विस्थापित होत नाही.

अनुसूची-चार

सामाजिक परिणाम निर्धारणाचा सारांश :-(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला) भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १० (क) अन्वये महाराष्ट्र शासन, महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दिनांक १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमाचे कलम २ व ३ यांच्या तरतुदी लागू करण्या पासुन सूट देण्यात आली आहे.

अनुसूची-पाच

नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील

(अ)	प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम	:–	- निरंक -
(ब)	प्रशासकाच्या कार्यालयाचा पत्ता	:–	- निरंक -
(क)	ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे, त्या अधिसूचनेचा तपशील	:–	- निरंक -

विशेष नोंद :- जमिनीचा नकाशा उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, ब्रम्हपुरी, जिल्हा चंद्रपूर यांच्या कार्यालयात पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

पर्वणी पाटील,
उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी, ब्रम्हपुरी.

ब्रम्हपुरी :
दिनांक २० नोव्हेंबर, २०२५.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.